प्रकाश ठोसरे, भा.व.से.
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे.

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे यांचे कार्यालय,
जुनी पी एम टी बिल्डींग, स्वारगेट, पुणे.

अर्ध शासकीय पत्र क्रमांक कक्ष-१/जमीन/ ९८ /२००५-२००६.
पुणे- ४११ ०३७, दिनांक २ मे, २००५.

उपवनसंरक्षक पुणे वनविभाग,पुणे
विभाग :-
आवक क्र :- ३४
दिनांक :- ६/५/०५
मुख्य लेखापाल.

विषय- याचिका क्रमांक २०२/९५ व १७१/९६ (गोदावरमन विरुध्द भारत सरकार) यामध्ये दिनांक १२.१२.१९९६ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे अनुषंगाने "वन" या संज्ञेत येणा-या क्षेत्रासंबंधी तज्ञ समितीची (Expert Committee) स्थापना.

संदर्भ- इकडील अर्ध शासकीय पत्र क्रमांक कक्ष-१/जमीन/५६८, दिनांक १०.०३.२००५.

प्रिय श्री.

गोदावरमन विरुध्द भारत सरकार या सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे अनुषंगाने "वन" या संज्ञेत येणा-या वनक्षेत्राची माहिती अद्याप या कार्यालयास उपलब्ध करुन देण्यांत आलेली नाही. दिनांक १७.११.२००४ रोजी या कार्यालयात मुख्य वनसंरक्षक व केन्द्रस्थ अधिकारी यांनी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्तावाबाबत बैठक घेतली होती. त्यावेळी महसूल विभागाकडून सदरील आयडेन्टीफाईड क्षेत्रासंबंधी माहिती उपलब्ध करुन देण्याविषयी समक्ष सूचना देण्यात आलेल्या आहेत. मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांनी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत कार्यान्वित प्रस्तावाच्या मान्यतेच्या संदर्भात पुणे जिल्ह्यातील आयडेन्टीफाईड क्षेत्राच्या माहितीसाठी पुन्हा विचारणा केलेली आहे. या कार्यालयाकडून पाठविलेले प्रस्तावही सदरमाहितीसाठी परत करण्यात येत आहेत. या माहितीशिवाय प्रस्तावाचे संस्करण करण्याचे काम खोळंबले आहे. तरी विहित प्रपत्रात मागविलेली माहिती आपण त्वरीत या कार्यालयास उपलब्ध करण्यात यावी हि विनंती.

आपला
स्वा/-
( प्र. ज. ठोसरे )

प्रति,
श्री. प्रभाकर देशमुख भा.प्र.से.,
जिल्हाधिकारी, पुणे.

प्रतिलिपि,
(१) विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.
(२) मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा., नागपूर यांचेकडे त्यांचे पत्र क्रमांक कक्ष-१७/नोसेल/२/प्रक१९५१/६३, दिनांक ८.४.२००५ चे अनुषंगाने माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव सस्नेह अग्रेषित.

प्रत, उपवनसंरक्षक, पुणे / जुन्नर व उप विभागीय वन अधिकारी, भोर यांचेकडे प्रकरणी पाठपुरावा करणेकामी रवाना.

5 MAY 2005